# <u>प्रेस नोट</u>

**<u>पुणे अग्निशमन दलाकडून पीजी व हॉस्टेलसह भंगार गोडाऊनचीही तपासणी सुरु</u>**

मा.महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांच्या आदेशानुसार मुख्य अग्निशमन अधिकारी गणेश सोनुने, अग्निशमन अधिकारी प्रभाकर उम्राटकर, बांधकाम विभागाचे अभियंता विश्वजीत वाघमोडे यांनी सलग तिसऱ्या दिवशी पीजी व हॉस्टेलसह भंगार मालाची दुकाने गोडाऊन यांची अग्निशमन सुरक्षाविषयक तपासणी करीत बंद करण्याबाबत निर्देशित केले आहे.

पुणे शहरातील बांधकाम व अग्निशमन उपाययोजनांबाबत पाहणी सुरू असताना काही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भंगार संकलन करणारी दुकाने गोडाऊन व त्याचप्रमाणे त्यावर प्रक्रिया करणारे युनिट आढळून आले आहेत. सदरच्या युनिटमध्ये कोणत्याही प्रकारची सुरक्षिततेबाबत साधने, अग्निशमन यंत्रणा, बांधकाम परवानग्या तसेच योग्य ते विद्युत वितरण दिसून आले नाही.

त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पेपर, स्टील, लोखंडाचा भंगार माल, पोते, कागद व इतर ज्वलनशील वस्तूंचा साठा निदर्शनास आला व सदर ठिकाणी सर्व ठिकाणी पत्र्याचे शेड व हे सर्व रहिवाशी भागामध्ये आढळून आले आहेत.

तरी सदर भंगार दुकाने गोडाऊन यांना याबाबत तपासणी करुन बंद करण्याचे आदेश देऊन सर्व प्रकारच्या परवानग्या घेण्यास सांगितले आहे.

आज वडगाव बुद्रुक, नर्हे, धायरी येथील १३ पीजी आणि ७ भंगार मालाची दुकाने गोडाऊन यांना बीडीपी झोन, अरुंद रस्ते, अग्निशमन यंत्रणा, अधिकृत विद्युत पुरवठा, ड्रेनेज, कर आकारणी अशा विविध परवानग्या आढळून न आल्याने या आस्थापना बंद करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच बऱ्याच ठिकाणी सर्व भाडेतत्त्वावर असल्याने यावर कोणतेही नियंत्रण नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे अशा अनधिकृत व विनापरवाना आस्थापनांवर गुन्हे दाखल करण्याचे व तात्काळ सील करण्याचे आदेश मा. महापालिका आयुक्त यांनी दिले आहेत.

"ज्या आस्थापना अग्निसुरक्षाविषयक व विनापरवाना चालविल्या जातील त्यांच्यावर अशाच प्रकारे कडक कारवाई करून बंद करण्यात येतील. अग्निशमन दलाकडून ही तपासणी मोहीम सुर ठेवत नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे."